नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.३०६**

**सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक १० याची जबानी**

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

नांव - गजानन निनाजी भारंबे

वय - ४२ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. - म्हैसवाडी, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.आर.बी. देवराज यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

०१. माझी शेती कोरवाड शिवारात आहे. त्याचा गट क्र. ३६ आहे. सन २०२२-२३ मध्ये मी त्या शेतात कापूस व तूर पेरले होते. माझे त्यावेळी कापसाचे उत्पन्न ८७ क्वींटल ७५ किलो झाले होते. तो कापूस मी आरोपी क्र. १ जगन्नाथ रामचंद्र नारखेडे याला विकला होता. आरोपी क्र. १ हा माझा नातेवाईक असून मी त्याला ओळखतो. आम्ही बैल बाजारात गेलो तेथे जगन नारखेडे हा हजर होता. आम्ही समोरासमोर गेलो त्याने त्यावेळी एका महिन्याच्या कराराकरिता ९ हजार प्रति क्वींटलचा दर ठरला होता. त्यानंतर दुस-या दिवशी दसरखेड येथील कार्तिक पेपर मील येथे खाली गाडी आली. आरोपी क्र. १ ने मला दसरखेड येथे बोलावले. तेथे खाली गाड्यांचा काटा केला आणि त्यानंतर म्हैसवाडी येथे गेलो. माझ्या भाड्याच्या खोलीमधील पूर्ण कापूस गाडीमध्ये भरला. कापूस भरल्यानंतर आम्ही परत दसरखेडला गाडीचा काटा करण्याकरिता आलो. त्यानंतर मी मलकापुरला आलो. त्यानंतर मी आरोपी क्र. १ व वाहन चालकाशी बोललो. दसरखेडला गेल्यानंतर काटा पट्टी केली व नंतर मलकापुरला आलो व तेथे आरोपी क्र. १ ला अस्सल काटा पट्टी दिली. पुढे एक महिना उलटून गेला. त्यानंतर मी आरोपी क्र. १ च्या घरी कापसाचे पैसे घेण्याकरिता गेलो. त्याने मला दोन चार दिवसाने पैसे देतो असे सांगितले. त्यानंतर आठ दिवस उलटून गेले. पुढे मी व माझ्या पत्नीने आरोपी क्र. १ ला फोन लावला. आम्ही दोघांनी त्याला सांगितले की, आम्ही प्लॉट घेतला असून तातडीने पैशाची आवश्यकता आहे. त्याला आम्ही प्लॉट घेण्याकरिता दोन लाख दिल्याचेही सांगितले. त्यानंतर त्याने आम्हाला उद्या म्हैसवाडीला येतो असे सांगितले. दुस-या दिवशी मी व आरोपी क्र. १ दिपक राणे याच्या घरात बसलो. त्यावेळी मी व

माझ्या पत्नीने आरोपी क्र. १ ला पैशाबाबत विनंती केली असता त्याने पैसे आठ दिवसाने देतो असे सांगितले. त्यानंतर काही दिवस उलटून गेल्यानंतर आरोपी क्र. १ हा गायब झाला. तो त्याच्या घरी भालेगाव येथे हजर मिळाला नाही. काही दिवस उलटून गेल्यानंतर पोलीसांनी आम्हाला फोन केला. पोलीसांनी माझ्याकडे जगन नारखेडे याला कापूस दिल्याची चौकशी केली. त्यांनी मला मलकापुरला बोलावले मी पोलीसांनीकडे ७/१२ उतारा, काटेपावतीची व आधारकार्डची प्रत असे दस्त दिले. आता मला प्रमाणित ७/१२ उतारा दाखविण्यात आला. त्यास **<u>निशाणी क्र.३०७</u>** देण्यात येते. पोलीसांनी मला रक्कम व किती क्वींटल कापूस होता याबाबत चौकशी केली होती. मी त्यांना ७,८९,७५०/- रूपये असल्याचे सांगितले. मी आरोपी क्र. १ जगन नारखेडे याला ओळखतो. आता मला आरोपी क्र.१ याला दृकश्राव्य पध्दतीने दाखविण्यात आले. तो तोच आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०२. दिपक राणे माझे शेजारी आहेत. त्यांनी व मी सोबत कापूस दिला होता. मी पोलीसांना बयाण देतेवेळी आम्ही बैल बाजारात गेलो तेथे जगन नारखेडे हा हजर होता. आम्ही समोरासमोर गेलो त्याने त्यावेळी एका महिन्याच्या कराराकरिता ९ हजार प्रति क्वींटलचा दर ठरला होता. त्यानंतर दुस-या दिवशी दसरखेड येथील कार्तिक पेपर मील येथे खाली गाडी आली. आरोपी क्र. १ ने मला दसरखेड येथे बोलावले. तेथे खाली गाड्यांचा काटा केला आणि त्यानंतर म्हैसवाडी येथे गेलो. माझ्या भाड्याच्या खोलीमधील पूर्ण कापूस गाडीमध्ये भरला. कापूस भरल्यानंतर आम्ही परत दसरखेडला गाडीचा काटा करण्याकरिता आलो. त्यानंतर मी मलकापुरला आलो. त्यानंतर मी आरोपी क्र. १ व वाहन चालकाशी बोललो. दसरखेडला गेल्यानंतर काटा पट्टी केली व नंतर मलकापुरला आलो व तेथे आरोपी क्र. १ ला अस्सल काटा पट्टी दिली. पुढे एक महिना उलटून गेला. त्यानंतर मी आरोपी क्र. १ च्या घरी कापसाचे पैसे घेण्याकरिता गेलो. त्याने मला दोन चार दिवसाने पैसे देतो असे सांगितले. त्यानंरत आठ दिवस उलटून गेले. पुढे मी व माझ्या पत्नीने आरोपी क्र. १ ला फोन लावला. आम्ही दोघांनी त्याला सांगितले की, आम्ही प्लॉट घेतला असून तातडीने पैशाची आवश्यकता आहे. त्याला आम्ही प्लॉट घेण्याकरिता दोन लाख दिल्याचेही सांगितले. त्यानंतर त्याने आम्हाला उद्या म्हैसवाडीला येतो असे सांगितले. दुस-या दिवशी मी व आरोपी

क्र. १ दिपक राणे याच्या घरात बसलो. त्यावेळी मी व माझ्या पत्नीने आरोपी क्र. १ ला पैशाबाबत विनंती केली असता त्याने पैसे आठ दिवसाने देतो असे सांगितले. त्यानंतर काही दिवस उलटून गेल्यानंतर आरोपी क्र. १ हा गायब झाला. तो त्याच्या घरी भालेगाव येथे हजर मिळाला नाही. काही दिवस उलटून गेल्यानंतर पोलीसांनी आम्हाला फोन केला. पोलीसांनी माझ्याकडे जगन नारखेडे याला कापूस दिल्याची चौकशी केली. त्यांनी मला मलकापुरला बोलावले मी पोलीसांनीकडे ७/१२ उतारा, काटेपावतीची व आधारकार्डची प्रत असे दस्त दिले. पोलीसांनी मला रक्कम व किती क्वींटल कापूस होता याबाबत चौकशी केली होती. मी त्यांना ७,८९,७५०/- रूपये असल्याचे सांगितले होते. सदर बाबी माझ्या बयाणात का नमूद नाहीत याचे कारण मी सांगू शकत नाही.

०३. माझ्या शेतात एकरी १० क्वींटल कापूस होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्याकडे कापूसही नव्हता व तसा कापूस मी आरोपी क्र. १ याला विकलेलाही नव्हता आणि त्यामुळे मी सांगितल्याप्रमाणे त्याचे कोणतेही पैसे मला देणे लागत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आपल्याकडील कापूस हा सप्टेंबर महिन्यापासून निघायला सुरूवात होते. हे म्हणणे खरे आहे की, कापसाचे पीक हे एकाच वेळी येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कापसाचे पिक हे सप्टेंबर महिन्यापासून ते मार्च महिन्यापर्यंत येते. हे म्हणणे खरे आहे की, स्पटेंबर पासून ते मार्च महिन्यापर्यंत थोडा थोडा जमा झालेला कापूस शेतकरी हा एकत्र करु न विकत असतो. हे म्हणणे खरे आहे की, मी देखील याच प्रमाणे कापूस विकतो.

०४. हे म्हणणे खरे नाही की, कार्तिक पेपर मिलचे आप्पा पाटील हे माझे नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे नाही की, लोकांच्या वस्तूंचा काटा करून देण्याचे काम कार्तिक पेपर मील करीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०२२-२३ मध्ये कापसाचे भाव ९५०० ते ९८०० प्रति क्वींटल होते. पोलीसांनी चौकशी करेपर्यंत मी पोलीसांकडे फिर्याद किंवा तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, दिपक राणे याने मला म्हटले की, आरोपी क्र. १ व इतर आरोपींवर लोक कापूस घेतल्याचा आरोप करत आहेत त्यामुळे आपणही खोटी तक्रार करुन पैसे मिळवू असे म्हटले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ जगन नारखेडे याला भोटलो व त्याने मला एका महिन्याच्या कराराकरिता ९०००/- क्वींटल भाव सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी क्र. १ ला ८७ क्वींटल ७५ किलो कापूस

दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या कापसाची किंमत ७,८९,७५०/- होती व ते पैसे आरोपी क्र.१ ने मला दिले नाहीत असे खोटे सांगत आहे. मी आरोपी क्र. १ ला ८७ क्वींटल ७५ किलो कापूस व त्या अनुषंगाने त्याची होणारी किंमत ७,८९,७५०/- होते याबाबत मी आरोपी क्र. १ ला माझ्या वकीलांमार्फत नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. मी आरोपी क्र. १ ला नातेवाईक असल्यामुळे ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, इतर आरोपींशी माझी ओळखही नाही व त्याच्यांशी माझा संबंधही नाही. मी प्रत्यक्षात कापूस विकला व त्याने कापूस स्वीकारला हे दर्शवणारा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे उपलब्ध नाही. तपासादरम्याने तसा कागदोपत्री पुरावा देखील मी पोलीसांना दिला नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, माझ्याकडे तसा कोणताही दस्त उपलब्ध नाही म्हणून मी तो दिला नाही. मी वसुलीकरिता आरोपी क्र.१ किंवा इतर आरोपींविरुध्द प्रकरणात दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०६. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०७. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला..

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

१०. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....</u>**

११. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

१२. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१३. आरोपी क्र. १ ते ३ यांचा उलटतपास स्वीकृत करण्यात आला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.09.24 18:01:55 +0530

दिनांक : २४/०९/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर